नि.दि.दावा. क्र. ९८/२०१३.
शांताबाई व इतर वि. पांडुरंग व इतर.
MHKO150002912013.

## निशाणी क्रमांक ९२ व ९३ वरील एकत्रीत आदेश.

वादींनी नि. क्र.९३ चा अर्ज मयत प्रतिवादी क्र.२ चे नि. क्र.९२ वरील अर्जातील वारस पटलावरती घेण्यासाठी झालेल्या विलंबमाफीसह अवसानाचा आदेश रद्द करण्यासाठी दाखल केला आहे. वादींचे थोडक्यात कथन की, प्रतिवादी क्र.२ चे दि.०८.१२.२०२२ रोजी निधन झालेले आहे. वादी हे उत्तूर येथे राहत असून प्रतिवादी क्र.२ हा धामणे, ता. आजरा येथील दुस–या गावी राहत असल्यामुळे त्याला त्याच्या मृत्यूबाबत माहिती नव्हती. प्रतिवादी क्र.१ ने सदर बाब पुरसीसीद्वारे निदर्शनास आणल्यानंतर वादींनी चौकशी करुन कागदपत्रे मिळवून विलंब झाल्यामुळे त्यांना मुदतीत वारस पटलावरती आणता आलेले नाहीत. न्यायाच्या दृष्टीने मयत प्रतिवादी क्र.२ चे वारस पटलावरती घेणे गरजेचे असल्यामुळे त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादींच्या विधिज्ञांनी अर्जावरती लेखी म्हणणे दाखल करुन, न्यायाच्या कामी योग्य तो आदेश होण्याची विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी क्र.२ हा दि.०८.१२.२०२२ रोजी मयत झालेला असून वादींनी प्रस्तूतचा अर्ज मुदतीच्या कायद्याच्या परिच्छेद १२० व १२१ मधील तरतूदी प्रमाणे १५० दिवसांच्या आतमध्ये म्हणजेच दि.०८.०५.२०२३ पर्यंत दाखल करणे आवश्यक होते. परंतु, वादींनी प्रस्तूतचा अर्ज मुदतीत सादर केलेला नसल्यामुळे कायद्यातील तरतूदी प्रमाणे प्रतिवादी क्र.२ च्या विरोधात दावा अवसानयात झालेला आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता, वादींनी प्रस्तूतचा अर्ज ०२ वर्षांच्या विलंबाने दाखल केलेला आहे. सबब, तो पुर्णपणे मुदतबाहय असल्यामुळे दि. प्र. सं. आदेश २२ प्रमाणे चालण्यास पात्र नाही. अर्जातील मयत प्रतिवादी क्र.२ चे वारस हे या दाव्याकामी आवश्यक पक्षकार असल्यामुळे त्यांना दाव्यात समाविष्ट करणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र.२ मयत झाल्याची बाब नि. क्र.९१ प्रमाणे दि.१०.०३.२०२५ रोजी प्रतिवादी क्र.२ ने दिलेल्या

पुरसीसी वरुन वादी व न्यायालयाच्या निदर्शनास आलेली आहे. तद्नंतर वादींनी प्रस्तूतचा अर्ज दाखल केलेला आहे.

५. वरील विवेचनाचे अवलोकन केले असता, वादींचा प्रस्तूत अर्ज दि. प्र. सं. आदेश २२ च्या तरतूदी प्रमाणे चालण्यास पात्र नसून तो आदेश १ नियम १० प्रमाणे विचारात घेणे गरजेचे आहे. वादींची मागणी विचारात घेता, प्रस्तूतचा अर्ज आदेश १ नियम १० च्या तरतूदी प्रमाणे मंजूर करणे गरजेचे आहे. तसेच अर्ज मंजूर केल्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादी क्र.२ च्या वारसांना नैसर्गिक न्याय नाकारला जाऊन दाव्याची गुंतागुंत वाढण्याची तसेच अंतिम आदेशाची पुर्णपणे अंमलबजावणी होणे अशक्य आहे. त्यामुळे मी न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या बाबींचा विचार करता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## आदेश

१. अर्ज खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत असून खर्चाबाबत आदेश नाही.

२. नि. क्र.९२ मधील अर्जातील प्रतिवादी क्र.२ च्या वारसांना प्रस्तूत दाव्यात प्रतिवादी क्र.२/१ ते २/२ म्हणून समाविष्ट करण्यासाठी वादींना परवानगी देण्यात येत असून त्यांनी नियमा प्रमाणे आवश्यक दुरुस्ती करुन प्रस्तावित प्रतिवादींना दाव्यात सहभागी करुन दाव्याची सुधारीत प्रत दाखल करावी.

३. वादींनी नियमा प्रमाणे दुरुस्ती करुन दाव्याच्या प्रती दिल्यानंतर प्रस्तावित प्रतिवादी क्र. २/१ ते २/२ यांना दाव्याच्या आदेशिका काढण्यात याव्यात.

४. प्रतिवादींना आवश्यकतेप्रमाणे त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये नियमा प्रमाणे दुरुस्ती करण्यास सवलत आहे.

५. वादी व प्रतिवादींनी आदेशाची नोंद घेऊन पुर्तता करावी.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

जे. ओ. कोड–एम.एच.०२८९७

दिनांक – २८.०४.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.